**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग जळगांव.**
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. जळगांव, नविन बस स्थानकाचे वर, जिल्हा पेठ, जळगांव.
ई मेल : dcjalgaon२३@gmail.com दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२८२७३
वेबसाईट : www.msrtc.gov.in दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२६६५३

जा.क्र.राप/विनिज/आस्था/ काशिउ/ १०५९ दिनांक : १३.०२.२०२५

**प्रति,**

म. सहाय्यक संचालक,
रोजगार व स्वयंरोजगार
जिल्हा सेवायोजन कार्यालय, जळगांव.

म.व्होकेशनल ॲण्ड एज्युकेशन
ट्रेनिंग ऑफिसर, जळगांव.

म.समाज कल्याण अधिकारी,
महाबळ रोड, मायादेवी मंदीरासमोर,
जळगांव

म.प्राचार्य,
इंजिनियरींग कॉलेज , बांभोरी,
ता.धरणगांव जि.जळगांव.

म.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.

म.प्राचार्य,
आय.टी.आय.जळगांव

म.आदिवासी विकास अधिकारी,
भाग्योदय कॉलनी ,
जळगांव.

म.प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
भुसावळ / बोदवड / जामनेर/चोपडा/अमळनेर/
भडगांव/चाळीसगांव/धरणगांव/एरंडोल/
मुक्ताईनगर/पाचोरा/पारोळा/रावेर/यावल.

म.प्रकल्प अधिकारी
एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,
यावल जि.जळगांव

म.अंशकालीन प्राचार्य,
मुलभूत तथा अनु.सुचना केंद्र
व्दारा - आय.टी.आय. जळगांव.

म.सेक्रेटरी,
जिल्हा सैनिक बोर्ड, जळगांव.

म.युनिव्हरसिटी एम्प्लॉयमेंट एक्सचेंज ब्युरो,
पुणे विद्यापिठ कॅम्प, गणेश खिंड, पुणे - ७

म.प्राचार्य,
गव्ह.पॉलीटेक्नीक, जळगांव.

म.सहा.संचालक [ट्रेनिंग]
बोर्ड ऑफ ॲप्रेंटीस ट्रेनिंग
एटीआय कॅम्पस, सायन , मुंबई - २२

म.प्राचार्य,
शासकीय इंजिनियरींग कॉलेज,
जळगांव.

म.प्राचार्य,
श्री.गुलाबराव देवकर इंजिनीयरींग कॉलेज,
शिरसोली रोड, जळगांव.

म. प्राचार्य,
गोदावरी इंजिनीयरींग कॉलेज,
भुसावळ रोड, जळगांव.

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम अंतर्गत भरती सत्र २०२५-२६ करीता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/एएफ-२२०/५३८० दि. ३०.१०.२०१५.
२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११ / २०१७ पत्र क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/१५७७ दि. २२/०३/२०१७.
३.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३४/२०२३ दि.०८.१२.२०२४

Scanned with OKEN Scanner

४.क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/घसं/३०८४ दि.२४.०४.२०२४
५.जाक्र.राप/विनिज/यंअशा/प्रशा/२५/१७९ दि.१२.०२.२०२५

**महाशय,**

ॲप्रेंटीस ॲक्ट-१९६१,१९७६, १९८६ नुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग येथील विभागीय कार्यालयात तसेच विभागीय कार्यशाळेत सन २०२५-२६ या सत्रासाठी तांत्रिक/तांत्रिक व्होकेशनल/अभियांत्रिकी या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची भरती करावयाची आहे. तरी या पत्रासोबत जाहीरात आपणांकडे पाठविण्यात येत असुन आपल्या मार्फत जाहिरातीतील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करणेबाबत अवगत करण्यात यावे. तसेच सदर उमेदवारांच्या याद्या या कार्यालयांस कळविण्यात याव्यात.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन जळगांव

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

- म.महाव्यवस्थापक [ क.व औ.सं.] रा.प.मध्यवर्ती कार्यालय मुंबई - ४०० ००८ .
- उपयंत्र अभियंता [चालन] रा.प.जळगांव. कळविण्यात येते की, या पत्रासोबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग येथील विभागीय कार्यालयात तसेच विभागीय कार्यशाळेत सन २०२५-२६ या सत्रासाठी तांत्रिक/तांत्रिक व्होकेशनल/अभियांत्रिकी या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची भरती करण्याबाबतची जाहीरात पाठविण्यात येत असुन सदर जाहीरात दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात यावी. व तसे केल्याचे या कार्यालयांस कळविण्यात यावे.
- विभागीय लेखा अधिकारी, रा.प.जळगांव यांना माहितीसाठी व कळविण्यात येते की, सन- २०२५-२६या सत्रासाठी कार्यशाळा शिकाऊ उमेदवारीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी जातीचा दाखल्याची झेरॉक्स प्रत, ऑनलाईन फार्म भरल्याचा रजिस्ट्रेशन पावती व आधार कार्ड दिल्यास खुल्या प्रवर्गासाठी रु.५०० +९०/- एकुण ५९०/- जीएसटी शुल्कासह व मागासवर्गीय उमेदवाराने जातीचा दाखला सादर केल्यास रु.२५० +४५/- एकुण २४५/- जीएसटी शुल्कासह स्विकारुन त्यांना पैसे भरल्याबाबतची जी-१२ पावती देण्यात यावी.
- आगार व्यवस्थापक, रा. प. जळगांव [व.] / जामनेर / अमळनेर / चोपडा / चाळीसगांव / पाचोरा / यावल / रावेर / भुसावळ / मुक्ताईनगर / एरंडोल आगार यांना कळविण्यात येते की, या पत्रासोबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग येथील विभागीय कार्यालयात तसेच विभागीय कार्यशाळेत सन २००२५-२६ या सत्रासाठी तांत्रिक/तांत्रिक व्होकेशनल/अभियांत्रिकी या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची भरती करण्याबाबतची जाहीरात पाठविण्यात येत असुन सदर जाहीरात आगार तसेच आपल्या अखत्यारीत येत असलेल्या वाहतुक नियंत्रण कक्ष येथे प्रवासांच्या व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात यावी. व तसे केल्याचे या कार्यालयांस कळविण्यात यावे. तसेच आपल्या आगाराच्या कार्यकक्षेत येत असलेल्या आय.टी.आय. यांच्या जाहीरातीच्या प्रती या पत्रासोबत देण्यात येत असुन सदरची प्रत संबंधित आय.टी.आय. यांचेकडे पाठविण्यात यावी तसेच त्यांची पोच घेऊन या कार्यालयांस पाठवावी.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन जळगांव

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग जळगांव.
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. जळगांव, नविन बस स्थानकाचे वर, जिल्हा पेठ, जळगांव.
ई मेल : dcjalgaon२३@gmail.com दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२८२७३
वेबसाईट : www.msrtc.gov.in दुरध्वनी क्र. : (०२५७) २२२६६५३

## जाहीरात

ॲप्रेंटीस ॲक्ट-१९६१,१९७६, १९८६ नुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग येथील विभागीय कार्यालयात तसेच विभागीय कार्यशाळेत सन २०२५-२६ या सत्रासाठी तांत्रिक / तांत्रिक व्होकेशनल / अभियांत्रिकी या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची भरती करावयाची आहे. त्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, भरावयाच्या जागा, वयोमर्यादा, प्रशिक्षण कालावधी इ. खालील प्रमाणे आहेत. सदर निकषानुसार शिकाऊ उमेदवार [ प्रशिक्षणार्थी ] घ्यावयाचे आहेत. सबब, खालील दिलेल्या व्यवसाय निहाय शैक्षणिक पात्रता पुर्ण करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावयाचे आहे.

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | भरावयाच्या जागांची संख्या | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा [५ वर्ष मागासवर्गीयांसाठी शिथिलक्षम] | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ] कार्यशाळेकडील व्यवसाय ( शासन मान्य संस्थेत पास असणे आवश्यक] | | |
| १ | मॅकेनिक मोटार व्हेईकल | ५५ | एसएससी पास आयटीआय मोटार मॅकेनिक व्हेईकल कोर्स पास. | १६ ते ३३ वर्ष | एक वर्ष |
| २ | मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर [पत्रे कारागीर] | ६० | एसएससी पास आयटीआय चा शिटमेटल कोर्स पास | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ३ | मेकॅनिक ॲटो इलेक्ट्रिकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स | ३० | एसएससी पास आयटीआय चा मेकॅनिक ॲटो इलेक्ट्रिकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स कोर्स पास | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ४ | वेल्डर | २० | एसएससी पास आयटीआय चा वेल्डर कोर्स पास | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ५ | पेंटर | ०६ | एसएससी पास आयटीआय चा पेंटर जनरल कोर्स पास | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ६ | डिझेल मेकॅनिक | ७० | एसएससी पास आयटीआय चा डिझेल मेकॅनिक पास. | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ७ | प्रशितन व वातानुकुलन [रेफ्रिजरेशन अॅन्ड एअर कंडीशनर | १० | एसएससी पास आयटीआय चा डिझेल मेकॅनिक पास. | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| ८ | इलेक्ट्रानिक्स | १० | एसएससी पास आयटीआय चा डिझेल मेकॅनिक पास. | वरील प्रमाणे | एक वर्ष |
| | | | क] अभियांत्रिकी व्यवसाय | | |
| ७ | अभियांत्रीकी पदविधर [यंत्र/मोटार] वरील व्यवसायातील उमेदवार न मिळाल्यास यांत्रिक / ॲटोमोबाईल इंजिनियरींग पदवीकाधारक | ०२ | अभियांत्रीकी मधील यांत्रिक / ॲटो मोबाईल या व्यवसायातील पदवीधर [बीई] पदवी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वरील व्यवसायातील उमेदवार न मिळाल्यास डिप्लोमा यांत्रीकी/ॲटो मोबाईल परिक्षा उत्तीर्ण उमेदवारांना घेण्यात येईल. | १८ ते ३३ वर्ष | एक वर्ष |

Scanned with OKEN Scanner

तसेच जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार कार्यालय, जळगांव यांचेकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्या व विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

तसेच सरकारी अथवा खाजगी कंपनीत एकदा उमेदवारी कायद्यानुसार शिकाऊ उमेदवारी केली असल्यास व अभियांत्रिकी [यांत्रिका] / ऑटो मोबाईल] पदवीधर/पदवीकाधारक उमेदवार जर ३ वर्षापुर्वी परीक्षा पास झालेले असतील अशा उमेदवारांचा यादीत समावेश करता येणार नाही.

सदर भरतीबाबचे अधिकार,पदांच्या संख्येत बदल करणे, भरती रद्द करणे, स्थगित करणे, याबाबतचे सर्व अधिकार रा.प.महामंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

तसेच यांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता ही विभागीय कार्यशाळाप्रमाणे आगार कार्यशाळामध्येही आहे. त्यामुळे कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांना आवश्यकतेनूसार आगार व विभागीय कार्यशाळा येथे नेमणूक देण्यात येईल.

उपरोक्त पदासाठी प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा असुन, व्यवसाय निहाय विद्यावेतन नियमानुसार दिले जाईल. उमेदवारांने खोटी माहिती पुरविल्यास वा चुकीची माहितीच्या आधारावर उमेदवारांस मुळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलविल्यास व तद्नंतर सदरची बाब निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारांस शिकाऊ भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर असला तरी त्याला नाकारण्याची रा.प. महामंडळास अधिकार राहील. अपुर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांनी प्रशिक्षण समाधानकारक रित्या पुर्ण झाल्यानंतर त्यास रा.प. महामंडळाच्या सेवेत सामावुन घेतले जाणार नाही. याची विशेष नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे अ.क्र.१ ते ६ वरील उमेदवारांनी www.apprenticeshipindia.org व अ.क्र.७ वरील उमेदवारांनी www.mhrdnats.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने रजिस्ट्रेशन करुन ॲप्लाय करणे आवश्यक आहे.
तरी कार्यशाळा शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रीया शुल्क मागासवर्गीयांसाठी २५० + ४५ एकुण = २९५/-[ जीएसटी शुल्कासह] व खुला प्रवर्गासाठी रु.५००+ ९० एकुण ५९०/- [जीएसटी शुल्कासह] महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग यांचे विभागीय कार्यालयास सदरचे शुल्क रोखपाल लेखाशाखा, विभागीय कार्यालय रा.प. जळगांव यांचेकडे दिनांक ०३.०३.२०२५ पर्यंत भरणा करावा.

**तरी उपरोक्त अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.**

१. या कार्यालयांतील छापील अर्ज.
२. लेखा शाखेत भरणा शुल्क भरल्याच्या पावती
३. ऑनलाईन भरलेला अर्ज
४. शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाईड प्रमाणपत्र
५. एसएससी [१० वी] गुणपत्रक व प्रमाणपत्र
६. आयटीआय चे प्रथम सेमिस्टर व द्वितीय सेमीस्टर
७. ऑल सेमिस्टर
८. एनसीव्हीटीचे प्रमाणपत्र
९. जातीचा दाखला,
१०. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध प्रमाणपत्र,
११. अधिवास [डोमेसाईल ] प्रमाणपत्र
१२. आधार कार्ड,

Scanned with OKEN Scanner

विहीत नमुन्यातील अर्ज विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, जळगांव विभाग येथे कार्यालयीन वेळेत शनिवार, रविवार व सुटीचे दिवस सोडुन दि. १३.०२.२०२५ पासुन दि.०३.०३.२०२५ यंत ठिक ११.०० ते १३.०० वाजेपर्यंत अर्ज मिळतील व सदर कालावधीमध्येच प्रक्रिया शुल्क भरणा करता येईल. उपरोक्त कागदपत्रांसह संपुर्ण भरलेले अर्ज दिनांक ०३.०३.२०२५ पर्यंत ठिक १७.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. तसेच विहीत मुदतीनंतर व इतर कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचण उद्भवल्यास बी.टी.आर.आय. जळगांव यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अर्ज सादर करण्याचा पत्ता -**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, जळगांव विभाग, जळगांव
नविन बस स्थानकाच्या वर,
जिल्हा पेठ, जळगांव - ४२५ ००१

विभाग नियंत्रक,
रा.प. जळगांव